ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांच्या समस्या

**सुप्रिया संजय कावळे[1], डॉ. हिरामण मधुकर क्षिरसागर[2]**

*के. टी. एच. एम. कॉलेज, नाशिक*

***Corresponding Author:*** *सुप्रिया संजय कावळे*

**DOI - 10.5281/zenodo.14875283**

**गोषवारा:**

*शेती ही मानवी इतिहासातील सर्वात जुनी आणि सर्वात महत्त्वाच्या पद्धतींपैकी एक आहे. जगभरातील संस्कृतीचा विकास आणि संवर्धन याने जागतिक वारसा घडवण्यास महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शेती हा मानवी सौजन्याचा कणा आहे, जो उदरनिर्वाह आणि आर्थिक विकासाचा महत्त्वाचा पाया आहे.*

*शेती म्हणजे काय ? तर शेतीही पिकांची लागवड पशुधन वाढवणे अन्न आणि मानवी जगण्यासाठी आणि आर्थिक समृद्धीसाठी आवश्यक असलेल्या इतर कच्च्या मालाची निर्मिती करण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचा वापर करण्याची पारंपारिक पद्धत आहे. मानवी जीवनात शेतीला मोठे महत्त्व आहे. शेती हे सर्वात जुने आणि सर्वात मूलभूत मानवी जीवनाचा एक भाग आहे, जे सुमारे 12,000 वर्षांपूर्वी भटक्या विमुक्तांच्या मानवी जीवनाला स्थायिक शेतीमुळे एकत्र येण्यास कारणीभूत केले आहे. वाढत्या जागतिक लोकसंख्येमुळे अन्नाची वाढती मागणी पूर्ण करणे हे कृषी क्षेत्राचे प्रारंभिक उद्दिष्ट आहे. उत्पादकता वाढविण्यासाठी आणि आवश्यक संसाधनांचा स्थिर पुरवठा नि:शंक करण्यासाठी शेतकरी विविध तंत्रे आणि पद्धतींमध्ये गुंतलेले असतात. विविध प्रदेश आणि हवामान विविध कृषी पद्धती पिके आणि पशुधन यांची उत्पत्ती करतात. शेती ही सर्व जगाचा पोशिंदा आहे कारण शेतीमध्ये जे पिकते ते मानवाला जगण्यासाठी आणि त्याची भूक भागविण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळे मानवी जीवनात शेतीला फार मोठे महत्त्व आहे. जागतिक विकासामध्ये, उत्पादन आणि रोजगारांमध्ये कृषी क्षेत्राचा भारदस्त वाटा आहे.*

*भारतात 18 व्या शतकापर्यंत सारंजामशाही अस्तित्वात होती आणि याच काळात युरोप राष्ट्र संकल्पना उदयाला आली. याबरोबरच सरंजामशाही संपुष्टात आली याचा परिणाम म्हणजे वेतन तत्वावर काम करणारा मजुरांचा वर्ग उदयाला आला. ब्रिटिश काळात यांत्रिकीकरण झाले आणि हातमाग (हस्तकला, गृह उद्योग, कारागिरी, इ.) उद्योग बंद पडले. कारण यांत्रिकीकरणामुळे यंत्र कामाच्या वस्तूंना मागणी वाढली कारण त्या स्वस्त आणि दर्जेदार असत. त्यामुळे हातमाग उद्योग आणि कुटीर उद्योग बंद पडल्यामुळे या लोकांना शेतमजुरी शिवाय पर्याय राहिला नाही. शेतकरी वर्गाने कर्जबाजारीपणामुळे आपल्या शेतजमिनी गावातील सावकार आणि मोठे जमीनदार वर्ग यांच्याकडे गहाण टाकल्या त्यामुळे ते प्रचंड कर्जबाजारी झाले. आणि ते कर्ज जास्त व्याजाने असल्याने ते कर्ज त्या वर्गास फेडता आले नाही. आणि त्यामुळे सावकार आणि मोठ्या जमीनदार वर्गाने यांच्या जमिनी स्वतः च्या नावावर करून घेतल्या त्यामुळे या शेतकऱ्यांना मजुरी शिवाय दुसरे काही काम उरले नाही. बहुसंख्या महिला या शेतीशी निगडित कामे करतात. परंतु तरीही त्यांना पुरुषांच्या तुलनेत कमी वेतन मिळते. त्यामुळे त्यांना सक्षम बनविण्यासाठी व चांगल्या रोजगार प्राप्तीसाठी आणि त्यांच्या कौशल्यात वाढ करण्यासाठी केंद्र सरकारने अनेक कायदेशीर उपाययोजना केल्या आहेत. 1988 च्या श्रमशक्ती आयोगाच्या अह बलानुसार नऊ कोटी महिला वेतन मिळवितात परंतु त्यांच्या रोजगारात आणि सुरक्षिततेसाठी कोणतेही नियम व कायदे नाही. तसेच महत्त्वाच्या बाबी म्हणजे गरीब महिलांच्या बाबतीत सरकारी अधिकाऱ्यांची असंवेदनशीलता व त्यांना समाजात सन्मान न मिळणे. काही वर्षांपूर्वी तर असंघटित महिलांचे काम हे काम मानले जात नसे. आणि समाजात महिलांना दुय्यम स्थान असल्यामुळे या महिलांच्या पदरी काहीच मोबदला पडत नसे. त्यामुळे महिलांचे अर्थव्यवस्थेतील भूमिका समजणे कठीण आहे.*

*परंतु आज परिस्थिती बदललेली दिसते. ग्रामीण भागातील महिलांचा विकास व्हावा म्हणून सरकारी धोरणांमध्ये बदल करून तसेच सरकारने महिला विकासाच्या बाबतीत महत्त्वाच्या वेगवेगळ्या योजना राबविल्या आहेत.*

*तरी देखील महिलांच्या अनेक प्रकारच्या समस्याआपल्याला दिसून येतात. ग्रामीण भागात तर याचे प्रमाण खूप जास्त आढळते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.*

**प्रास्ताविक :**

ग्रामीण भागातच शेतमजुरांची संख्या जास्त आढळते. त्यामुळे शेती उत्पादनात शेतमजुरांचा वाटा हा मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. आणि शेतमजुरांची संख्या जास्त असल्यामुळे स्पर्धा वाढते. आणि त्यांचे शोषणही मोठ्या प्रमाणात होत असते. सहाजिकच त्यांचे सामाजिक व आर्थिक जीवन हे निकृष्ट किंवा मागासलेले आपल्याला दिसून येते. विकसनशील देशांमध्ये शेती क्षेत्राला नेहमीच अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. भारत हा विकसनशील देश असल्यामुळे भारतामध्ये सुद्धा शेतीला सगळ्यात जास्त महत्त्व दिले गेले. असे असूनही भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 69 टक्के लोक हे भारतातील ग्रामीण भागात वास्तव्य करतात. या ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. तसेच शेतीवर आधारित व्यवसाय जसे की पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, इत्यादी शेतीला जोड व्यवसाय म्हणून महत्त्वाचे आहे. तसेच ग्रामीण भागातील भूमिहीन लोकांसाठी शेतमजुरी हे देखील रोजगाराचे मुख्य साधन आहे. महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर “ खेड्यांकडे चला ” असे म्हटले होते. कारण त्यांनी शेती व शेतीवर आधारित व्यवसाय आणि लघुउद्योग यांचे महत्त्व जाणले होते. शेतीचा विकास होण्यासाठी शेतमजूरही तितकेच महत्त्वाचे आहे.. कारण मजुरांशिवाय शेतीचा विकास होणे शक्य नाही. महत्त्वाचे म्हणजे यामध्ये महिलांचा वाटा सगळ्यात जास्त व महत्त्वाचा असल्याचे आढळते. म्हणूनच या शोधनिबंधामध्ये ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांच्या वेगवेगळ्या समस्या जाजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांच्या आर्थिक सामाजिक शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.
2) ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांना मिळणाऱ्या मजुरीचा अभ्यास करणे.
3) ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांच्या स्थलांतराच्या समस्या अभ्यासणे.
4) ग्रामीण भागातील महिला शेतमजुरांच्या शेतीतील विविध कामातील सहभागाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

हा शोध निबंध संदर्भ ग्रंथ व पुस्तके यासारख्या दुय्यम साधनसामग्री वर आधारित आहे.

**१) कौटुंबिक समस्या:**

पूर्वी पासूनच समाजात एकत्र कुटुंब असो किंवा विभक्त कुटुंब असो प्रत्येक कुटुंबात केंद्र स्थानी पुरुषच असल्याचे दिसून येते. कुटुंबातील प्रत्येक महत्वाचे निर्णय हे कुटुंबातील पुरुषच घेताना दुसून येतात. स्त्रियांनी फक्त घरातील कामे करायची इतर कुठल्याही गोष्टींमध्ये स्त्रियांना बोलण्याचा अधिकार नव्हता अलीकडे या मध्ये थोडी सुधारणा झाल्याचे दिसून येते. परंतु ते फक्त शहरी भागात ग्रामीण भागात अजूनही ही स्थिती तशीच दिसून येते. म्हणजेच ग्रामीण भागातील स्त्रियांना अजूनही पुरुष सांगतील त्या प्रमाणेच वागावे लागते. अजूनही या स्त्रियांना कुठल्याही प्रकारचे निर्णय स्वत: घेण्याचा अधिकार नसल्याचे दिसून येतात.

**२) पितृसत्ताक संस्कुती:**

ग्रामीण भागात बहुसंख्य कुटुंबात वडिल हेच कुटुंबाचे प्रमुख असल्याचे दिसून येतात. त्यामुळे कुटुंबातील सगळे निर्णय हे वडीलच घेतात. पूर्वी पासूनच हि प्रथा चालत आली असून या प्रथेला कुणीही विरोध करत नाही. मुख्य म्हणजे ग्रामीण भागातील मजुरी करणाऱ्या कुटुंबांची स्थिती हि नाजूक असल्या कारणाने आणि गरिब घरातील मुलीनी जास्त शिक्षण करू नये या विचारांमुळे या कुटुंबातील मुली या उच्च शिक्षण घेऊ शकत नही तसेच गरिबीमुळे या मुलीना आपल्या आई-वडिलांसोबत मजुरीला जावे लागते.

**३) श्रम विभाजन:**

श्रमाच्या बाबतीत विचार केला असता महिलांना प्रत्येक ठिकाणी पुरुषांपेक्षा कमी कष्टाची कामे दिली जातात. साहजिकच त्यामुळे त्यांना पुरुषांच्या तुलनेत माजुरी ही कमी दिली जाते. म्हणजेच महिला ह्या पुरुषांप्रमाणे मेहनतीची कामे करू शकत नाही. कारण त्या शरीरिक व मानसिक दृष्ट्या दुर्बल असतात हा त्यामागील उद्देश असतो. त्यामुळे महिलांच्या कामावर मर्यादा येतात परिणामी त्यांना मोबदला ही कमी मिळतो.

**४) मालमत्ता:**

बहुतांश कुटुंबात मालमत्ता किंवा संपत्ती ही घरातील पुरुषांच्या नावे असल्याचे दिसून येते. महिला ह्या लग्नाअगोदर परक्याची धन आहे असे समजले जाते तसेच लग्न झाल्यावर सुद्धा तिला सासरी परक्याची लेक आहे असे समजले जाते. म्हणजेच महिलांना कुटुंबात परक्यासारख रहाव लागत. शेतमजूर महिलांच्या बाबतीत विचार केला तर त्या फक्त शेतमजूर म्हणून काम करतात परंतु त्यातून मिळणाऱ्या मजुरीवर मात्र त्यांचा हक्क किंवा अधिकार नसतो. ग्रामीण भागातील महिला ह्या पैसे कमवतात परंतु ते पैसे खर्च करण्याचा अधिकार मात्र त्यांना नसतो. मुख्य म्हणजे कुठल्याच संपत्ती वर त्यांचा अधिकार नसतो.

**५) वैवाहिक जीवन:**

वैवाहिक जीवनात महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. ग्रामीण भागातील मुलींना मुलांपेक्षा कमी शिक्षण देले जाते. त्याचे कारण म्हणजे उच्च शिक्षणासाठी मुलींना शहरात जावे लागते. त्यामुळे शिक्षणाचा खर्च तर वाढतोच परंतु मुलीना घरापासून लांब ठेवण्यास घरातील लोक तयार होत नाही. मुलींचे शिक्षण थांबते त्यामुळे या मुलींचे कमी वयातच लग्न करून दिले जाते.

त्यातही ग्रामीण भागात आजही हुंडा पद्धती चालू असल्या कारणाने मुलींच्या लग्नाला मोठ्या प्रमाणात खर्च होतो. हा खर्च करूनही मुलींच्या सासरच्यांच्या मागण्या ह्या चालूच असतात. त्या मागण्या पूर्ण करण्यासाठी अनेक वेळा या महिलांवर अन्याय केला जातो. म्हणजेच लग्नानंतर देखील या महिलांचे वैवाहिक जीवन हे सुरळीत नसते.

**६) सामाजिक दुय्यम वागणूक:**

समाजात महिलांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. म्हणजेच समाज पातळीवर कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्याचा अधिकार हा फक्त पुरुषांना दिला जातो. त्यातही शेतमजूर महिला ह्या गरीब घरातील असतात. त्यामुळे त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक मिळते.

**७) अपत्य न होणे:**

आज ही समाजात दाम्पत्याला काही कारणास्तव मुलबाळ होत नसेल तर त्या दोघांपैकी एकात दोष असू शकतो. परंतु तरीही त्याचा पूर्ण दोष त्या महिलेला दिला जातो. कुटुंबातील व्यक्ती हीन वागणूक देतात. शारीरिक, मानसिक तिचा छळ केला जातो. वैद्यकीय दृष्ट्या स्त्री जबाबदार नसली तरीही समाजात तिच्याकडे वांझ म्हणून पहिले जाते. त्याचा परिणाम त्या महिलेच्या शारीरिक व मानसिकतेवर

होतो. काही वेळा तर वंशाला दिवा पाहिजे म्हणून तो पुरुष दुसरा विवाह देखील करतो. परंतु आज ही प्रथा बऱ्याच प्रमाणात कमी झालेली दिसते. कारण पहिली पत्नी असताना दुसरा विवाह करणे हा कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला आहे.

**८) पुरुषांची व्यसनाधीनता:**

ग्रामीण भागातील अनेक पुरुष हे कर्जबाजारीपणा, गरिबीला कंटाळून किंबा इतर काही कारणास्तव व्यसनाच्या आहारी जातात. त्यात ते दारू, झुगार, सटटा या सारखी व्यसने करतात. ग्रामीण शेतमजूर हे दिवसभर काम करतात परंतु रात्री मात्र दारू पिऊन महिलांना मारहाण करतात. त्यामुळे ह्या महिलांना सतत त्रास सहन करावा लागतो.

**९) आरोग्य विषयक समस्या:**

ग्रामीण भागात अजूनही काही ठिकाणी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध नाही. त्यातही शेतमजूर महिलांना कष्टाची कामे करावी लागतात. या कुटुंबातील मुलींना लहान पणापासूनच कष्टाची कामे करावी लागतात. त्याचप्रमाणे कुपोषण, अस्वच्छता, शिक्षणाचा अभाव, आरोग्य विषयक सुविधांचा अभाव व मानसिक ताणतणाव यामुळे देखील अनेक आजारांना या स्त्रिया बळी पडतात. अति दुर्गम भागात आरोग्याच्या चांगल्या सुविधा उपलब्ध नसतात. अशावेळी कमी वयात लग्न झाल्यामुळे काही महिलांचा प्रस्तुतीच्या वेळी उपचार अभावी मृत्यू होतो.

**१०) राहणीमानाचा निकृष्ट दर्जा:**

ग्रामीण भागातील शेतमजूर महिलांचा राहणीमानाचा दर्जा हा खालावलेला दिसून येतो. कारण या महिलांच्या कुटुंबाची परिस्थिती ही हालाकीची असते. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी ही त्या महिलेवर असते. त्यामुळे कुटुंबाच्या मुलभूत गरजा ह्या देखील यांच्या मजुरीवर पूर्ण होत नाही. त्यामुळे त्यांचे राहणीमान हे देखील निकृष्ट दार्जाचे असते. त्याच प्रमाणे रोज दुसऱ्याच्या शेतात कामाला जावे लागल्यामुळे या महिलांना स्वत:कडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे देखील या महिलांच्या राहणीमानात सुधारणा होत नाही.

**११) निरक्षरता:**

ग्रामीण भागातील महिलामध्ये निरक्षरतेचे प्रमाण हे जास्त असल्याचे दिसून येते. अतिदुर्गम भागात शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नसतात. कुटुंबाची परिस्थीची हलाकीची असल्या कारणाने अर्ध्यावरच शिक्षण सोडावे लागते. त्याचप्रमाणे गरिबीमुळे त्यांना आईवडिलांसोबत कामाला जावे लागते. त्याच प्रमाणे ग्रामीण भागात मुलींना उच्च घेण्यासाठी शहरात जावे लागते. त्यामुळे घरापासून लांब जाण्यास काही वेळा स्वत: त्या मुली तयार होत नाही किंवा काही ठिकाणी कुटुंबातील लोक मुलींना बाहेर पाठविण्यास तयार होत नाही. किंवा तेथील समाजव्यवस्था तयार होत नाही. अशा अनेक कारणास्तव ह्या महिला अशीकक्षित राहतात. त्यामुळे ह्या महिलांना इतर उद्योग- व्यवसायात काम मिळत नाही. त्यामुळे त्याना अंगमेहनत केल्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे ह्या महिलांमध्ये शिक्षणाबाबतचे महत्व काय आहे. याची जाणीव करून देणे गरजेचे आहे.

**१२) महिला शेतमजुरांच्या संघटनेचा अभाव:**

शहरी भागातील औद्योगिक क्षेत्रातील महिला कामगार ह्या संघटीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्या मागण्या ह्या पूर्ण केल्या जातात. परंतु ग्रामीण भागातील शेतमजूर हे असंघटीत असल्या कारणाने त्यांच्या कुठल्याच मागण्या पूर्ण होत नाही. शिवाय त्यांच्यात विषमता असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते. प्रमाणापेक्षा जास्त काम करून घेतले जाते आणि मोबदला मात्र कमी दिला जातो. या शेतमजूर महिलांमध्ये शिक्षणाचा अभाव असल्या कारणाने त्यांना शेतीकाम सोडून इतर कुठले दुसरे काम पण मिळत नाही. त्याचाच फायदा जमीनदार घेत असल्याचे दिसून येते.

**१३) जातीयता:**

अजूनही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणत जातीयता असल्याचे दिसून येते. शेतमजूर हे बहुतांश गरीब व दलित वर्गातील असल्याने कारणाने समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन हा वेगळा असल्याचे दिसून येते. शेतमजूर महिला असो किंवा पुरुष तो जर चांगल्या वर्गातील असेल तर त्याला चांगल्या प्रतीचे काम दिले जाते. या उलट तो जर खालच्या वर्गातील असेल तर त्याला मात्र हीन वागणूक दिली जाते. शिवाय त्याला निकृष्ट दर्जाचे काम दिले जाते. शिवाय रोजंदारीत देखील फरक केला जातो.

**१४) अधिकार किंवा स्वातंत्र्याचा अभाव:**

ग्रामीण भागातील किंवा गावातील सामाजिक पातळीवरील सर्व निर्णय हे पुरुष घेतात. महिलांचा त्या मध्ये सहभाग नसतो. महिलांना स्वत:च्या बाबतीत निर्णय घेण्याचा देखील अधिकार नसतो. कुटुंबात देखील लग्नाच्या आगोदर वडील निर्णय घेत असतात तर लग्न झाल्यानंतर सुद्धा पुरुषच निर्णय घेत असतात. महिलांना स्वत:च्या पसंतीने विवाह करण्याचा देखील अधिकार नसतो. तो देखील वडिलाच घेत असतात. बऱ्याच वेळा मुलींना आपल्या इच्छेविरुद्ध जाऊन लग्न करावे लागते.

स्वातंत्र्याच्या बाबतीत देखील महिलांना कुटुंबात मोकळेपणाने बोलता किंवा वागता येत नाही. गावातील पुरुष मंडळी ही एकत्र येवून कुठल्याही विषयावर चर्चा करू शकतात. पण मात्र महिलांना मात्र तो अधिकार नाही. किंवा पुरुषांना बसण्यासाठी गावामध्ये पार, वाचनालय, व्यायाम शाळा अशी सार्वजनिक ठिकाणे आहेत. मात्र महिलांना एकत्र यायला अशी कुठलीच सार्वजनिक ठिकाणे असल्याचे दिसून येत नाही.

**सारांश:**

महिलांच्या बाबतीत असंख्य समस्या आहेत. या ग्रामीण भागातील महिलांचा विकास घडवून आणायचा असेल तर प्रथम त्या महिलांना त्याची जाणीव करून देणे महत्वाचे ठरेल. तसेच त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून दयावे लागेल. काही ठिकाणी महिलानसाठी सोयी सुविधा सरकारने केल्या आहेत. परंतु त्या अजून पर्यत त्या महिलांना माहितच नाही. त्याबद्दल त्यांना माहिती देणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**

१. ग्रामीण महिलांच्या मुलभूत समस्या आणि उपाय www.maxmaharashtra.com
२. वाणी नीता सुधाकर कृषी अर्थशास्त्र द्वितीय आ (२०१५)प्रशांत पब्लिकेशन जळगाव पृ.क्र १३७
३. मिश्र जय प्रकाश कृषी अर्थशास्त्र साहित्य भवन पब्लिकेशन २०२३ पृ.क्र.१५६
४. विजय कविमंडन कृषी अर्थशास्त्र मंगेश प्रकाशन नागपूर २००८ पृ.क्र. २५३
५. देशमुख प्रभाकर “श्रमाचे अर्थशास्त्र”विद्या प्रकाशन नागपूर जानेवारी १९८७ पृ.क्र. ३१८
६. भारतीय शेती – हरवलेली वाटचाल आणि शाश्वत पद्धतीची गरज, - www.vikaspedia.in.